## <u>निशाणी क्र. ११२ वरील आदेश</u>

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व ९ यांचे विरूध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश – ३९ नियम – १ व २ अन्वये तुतातूर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. **<u>वादीची कथने संक्षिप्तपणे खालील प्रमाणे आहेत :</u>–**

वादींनी प्रस्तुतचा दावा वाटप होवून पृथ्थ्क कब्जा मिळणेसाठी दाखल केलेलाआहे. दावा मिळकतीपैकी मोक्याचे जमिनीचे क्षेत्र म्हणजे घरभार मिळकत गट नं. ३६७१क या मिळकतीचे क्षेत्र् बळकावण्याचे हेतूने प्रतिवादी क्र. १ व ९ यांनी दांडगाईने वादीचे रहाते घराचे भागास खेटून गडग्याचे बांधकाम करणेकरीता दगडी चिरे आणून ठेवले आहेत. त्याबाबत वादी क्र. ५ यांनी विचारणा केली असता त्यास दुरुत्तरे केली आहे. प्रतिवादींनी दांडगाईने बांधकाम केल्यास वादीच्या घरात प्रवेश करण्यास व घराचे सांडपाणी जाणा–या मार्गावर गडग्याचे बांधकाम केल्यास वादींना सदर वाटपाचेवेळी सदर बांधकामाचा अडथळा निर्माण होणारा आहे. प्रतिवादींना तुर्तातुर्त ताकीद न झाल्यास वादी याचे कायदेशीर हक्कास बाधा निर्माण होवून त्यांचे कधीही पैशाचे स्वरुपात भरुन न येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये गडग्याचे अथवा घराचे वा मांगराचे बांधकाम करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद मिळण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. ९ याने नि. ११ कडे म्हणणे देवून अर्जास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादींनी वादी राहतो त्या घराच्या मागे अथवा पुढे कसल्याची प्रकारचे बांधकाम करण्याचे ठरविलेले नाही अगर वादीस अडथळा निर्माण होईल असे बांधकाम करण्याचा प्रतिवादीचा इरादा नाही. अर्जास कोणतेही कारण घडलेले नसताना दावा अंतिम टप्यात असताना मनाई आदेशान्वये प्रतिवादींची अडचण निर्माण होणेसाठी प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केलेला आहे. वादीने दावा मिळकतीची सध्याची वस्तुस्थिती पटलावर येणेसाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करुन मागितलेली नाही. वादी हा कायमस्वरुपी परगावी राहत आहे. वादीने खोटा व खोडसाळ अर्ज दाखल केला असल्यामुळे तो खर्चासह नामंजूर करण्याची विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

४. प्रतिवादी क्र. १ याने नि. ११८ कडे प्रतिवादी क्र. ९ याने दाखल केलेल्या म्हणण्याप्रमाणेच आपले म्हणणे असल्याची पुरशीस दाखल केली आहे.

५. या अर्जाच्या निर्णयाकरीता खालील मुद्दे माझ्या निदर्शनास येतात. त्या मुद्दयांचे पुढील कारणास्तव मी माझे निष्कर्ष देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी त्याच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस असल्याचे शाबित करतो काय ? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २ | न्यायाचा समतोल आपल्या बाजूने असल्याचे वादी शाबित करतो काय ? | होकारार्थी |
| ३ | तुर्तातूर्त मनाई न दिल्यास आपली अपरिमित हानी होणार असल्याचे वादी शाबित करतो काय ? | होकारार्थी |
| ४ | मागणीनुसार तुर्तातूर्त मनाई मिळण्यास वादी पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| ५ | हुकूम काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

६. अर्जातील कथना पुष्टयर्थ वादीने नि. ७ ते ४८ कडे दावा मिळकतींचे ७/१२ उतारे, नि. ४९ कडे वारस तपास नोंदवहीचा उतारा, नि. ५० कडे फेरफार क्र. १३०८ चा उतारा, नि. ५१ कडे फेरफार क्र. १६९४ चा उतारा अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. वादीने नि. ५ कडील कागदयादीसोबत फेरफार क्र. ७२२, फेरफार नं. १८१५ व दोन खरेदीखतांची झेरॉक्स प्रत अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. नि. ७४ कडील कागद यादीसोबत वादीने फेरफार नं. ५०९, एकत्रीकरण योजनापत्रक उतारा व आरटीएस अपिलांमधील न्यायनिर्णयाच्या प्रती दाखल केल्या आहेत.

**<u>मुद्दा क्र. १ ते ५ करीता :</u>**

७. वादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की , वाटपाचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ व ९ यांनी दावा मिळकत गट नं. ३६७१क चे मोक्याचे क्षेत्र बळकाविण्याच्या हेतूने वादीच्या घराचे भागास खेटून गडग्याचे बांधकाम करण्याकरीता दगडी चिरे आणून ठेवले आहेत. त्यांनी अशा प्रकारचे बांधकाम केल्यास वाटपावेळी गुंता निर्माण होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र. १ व ९ यांनी दावा मिळकतीमध्ये गडग्याचे अथवा कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये अशी तुर्तातुर्त मनाई देण्याची विनंती केली. याउलट प्रतिवादी क्र. ९ चे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की प्रतिवादीने कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्याचे योजलेले नाही. वादी व प्रतिवादी हे इमारतीमध्ये आपआपल्या राहत्या भागासमोर व मागे वहिवाट करतात व त्यांनी आपआपल्या वास्त्व्याच्या भागात साधी व दगडी कुंपणे केली आहेत. त्यामुळे कुणालाही अडथळा निर्माण होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही असा युक्तीवाद केला. तसेच अर्जास कोणतेही कारण घडले नसून खोटा अज्र देवून दावा अंतिम टप्पयावर असताना विलंब करण्याच्या हेतूने सदरचा अर्ज दाखल केल्याचे आपल्या युक्तिवादात सांगितले.

८. वादीने प्रतिवादीविरुध्द वाटपासाठी दावा दाखल केला असून सदरचा दावा अंतिम टप्प्यावर आलेला आहे. वादीने प्रतिवादी क्र. १ व ९ यांचेकडून दावा मिळकतीमध्ये दगडी चि–याच्या गडग्याचे बांधकाम होत असलेबाबत शपथेवर कथन केले आहे. तसेच चिऱ्याच्या गडग्याच्या बांधकामाबाबत फोटो हजर केलेला आहे. वादीस प्रथमदर्शनी केस आहे. न्यायाचे समतोलत्व व

नुकसानीचे तत्व वादीच्या बाजूने आहे. वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन उभयताकडून दावा मिळकतीमध्ये बांधकाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वादी अथवा प्रतिवादी यांनी दाव्याच्या अंतिम निर्णय होईपावेतो दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम केल्यास प्रत्यक्ष वाटपावेळी गुंता निर्माण होणार आहे व दावा निष्फळ ठरणार आहे. सबब, वादी व प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये असा आदेश केल्यास या अर्जाचा हेतू साध्य होईल असे माझे मत आहे. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## – आदेश –

१. वादी व प्रतिवादी क्र. १ व ९ यांनी दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो दावा मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये अशी मनाई देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निर्णयावर अवलंबून राहील.

( सलीम अ. जमादार )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर कणकवली.

दि. १७/०३/२०२२